महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३०३ वा | दिनांक :०१/१०/२०२५ | वार : बुधवार

## एका एकरसाठी ५० हजार रुपये मदत द्यावी, कर्जमाफीसाठी हीच योग्य वेळ : जयंत पाटील



**सांगली :** पूरग्रस्तांना मदत देण्यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारच्या मदतीची वाट न पाहता केंद्रातील सरकार आपलेच आहे, या भावनेने राज्याची तिजोरी रिकामी केली पाहिजे, असा सल्ला राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी महायुती सरकारला दिला आहे. तसेच कृपया करून एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे मदत करू नये, ते निकष आता जुने झाले असून महागाई वाढली आहे. त्यामुळे सरकारने पूरग्रस्तांना भरीव मदत द्यावी, अशी मागणी जयंत पाटलांनी केली आहे.

जयंत पाटील म्हणाले, पूरग्रस्तांसाठी दिलेले ५ हजार रुपये फार कमी आहेत. १० ते १५ हजार रुपये देणे गरजेचे होते, सरकारने तातडीने ती मदत द्यावी. एका एकरसाठी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच कर्जमाफी देण्याची ही योग्य वेळ आहे. मराठवाड्यात अनेकांनी आत्महत्या केली आहे. त्यामुळे आता कर्जमाफी द्यावी. केंद्राकडून मदत येईल याची वाट न पाहता राज्य सरकारने आता आपली तिजोरी रिकामी करावी, असेही जयंत पाटील यांनी म्हटले आहे.

मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी नाराज झालेला आहे. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर दसरा मेळावा सारखे कार्यक्रम घ्यावेत का? असा प्रश्न विचारण्यात आला असता जयंत पाटील म्हणाले, कोणते कार्यक्रम करायचे आणि कोणते नाही हे ज्याचा त्याचा निर्णय आहे. शेतकरी संकटात असताना कर्जमाफी करण्याचा सरकारने निर्णय घेतला तर तो शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरेल, असे पाटील म्हणाले.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना योग्य वेळी कर्जमाफी देऊ असे म्हटले होते. आता कर्जमाफीसाठी यापेक्षा चांगली वेळ असू शकत नाही. निवडणूक आल्यावर कर्जमाफी देण्यापेक्षा शेतकरी अडचणीत असताना कर्जमाफी दिली तर तो लाभदायक ठरेल, असे मत जयंत पाटील यांनी म्हटले आहे. निराशेतून मराठवाड्यसह संपूर्ण राज्यात गेल्या सहा महिन्यात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. सरकारने कर्जमाफी केली तर आत्महत्याचे प्रमाण पूर्णपणे थांबेल, अशी अपेक्षा जयंत पाटील यांनी व्यक्त केली आहे. तसेच सरकारने कर्जमाफीचा निर्णय आत्ताच घ्यावा, त्यासाठी नवा मुहूर्त काढू नये, असा खोचक सल्लाही जयंत पाटलांनी दिला आहे.

## अहिल्यानगर दंगल सरकार पुरस्कृत : विजय वडेट्टीवार

**मुंबई :** अहिल्यानगर येथील दंगल सरकार पुरस्कृत होती. शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवरून लक्ष हटवण्यासाठी ही दंगल घडवण्यात आली, असा आरोप कॉंग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मंगळवारी केला. त्यांच्या या आरोपामुळे या प्रकरणी वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अहिल्यानगर येथे सोमवारी आय लव्ह मोहम्मद असा उल्लेख असणारी रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीवरून दुर्गामाता दौडीचे आयोजन करण्यात आले होते. या मुद्यावरून शहरात मोठा तणाव निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी उपरोक्त आरोप केला आहे. ते म्हणाले, राज्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी रडत आहे. लोकांची घरे गेली आहेत. अन्नधान्य, कपडे, पीकपाणी वाहून गेले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात मोठे नुकसान झाले आहे. पण वादग्रस्त रांगोळी काढून दोन समाजात वाद निर्माण केला जात आहे. जनतेच्या प्रश्नांवर लक्ष हटवण्यासाठी या गोष्टी मुद्दाम घडवून आणल्या जात आहेत.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी राज्यातील पूरस्थिती व शेतकऱ्यांना बजावण्यात आलेल्या कर्जवसुलीच्या नोटीसांवरूनही राज्य सरकारला जाब विचारला. राज्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे २४ जिल्ह्यांतील १३७ तालुके बाधित झालेत. केवळ सप्टेंबर महिन्यातील शेतीपिकांचे नुकसान २६ लाख हेक्टरवर पोहोचले आहे. अशा वेळी बँकांकडून शेतकऱ्यांना कर्जवसुलीची नोटीस कशी काय देण्यात आली? सरकार झोपा काढत आहे का? अहिल्यानगर बीड, जालना, सोलापूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, यवताळ ह्या जिल्ह्यांना मोठा फटका बसला.

खरीप हंगामातील सुमारे ५२ लाख हेक्टरवरील पीक पाण्यात गेले. खरीप हंगाम तर हातातून निसटला आहे, पण रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. अनेक ठिकाणी शेतजमीन खरवडून गेल्याने शेतकरी रब्बी हंगामापासूनही वंचित राहण्याची शक्यता आहे. या स्थितीत बँकांनी कर्जवसुलीच्या नोटीसा दिल्यात. सरकारने या बँकांना सूचना का दिल्या नाही? शेतकऱ्यांकडून सक्तीची कर्जवसुली तत्काळ थांबली पाहिजे, असे वडेट्टीवार म्हणाले.

ते पुढे म्हणाले, सरकारने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना दिलासा देणारे ठोस निर्णय घ्यावेत. अतिवृष्टीग्रस्त जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांचा संसार पूर्णतः उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे त्यांना लवकर पुन्हा उभे करण्यासाठी भरीव मदत करण्याची गरज आहे. पण अजूनही केंद्राचे पथक पाहणी करण्यासाठी आले नाही. राज्य सरकारकडून केंद्राला केव्हा प्रस्ताव पाठवणार आहे? मदत कधी मिळणार? असे विविध प्रश्नही वडेट्टीवार यांनी या प्रकरणी उपस्थित केलेत.

## सर्वसामान्यांचा दिवाळीचा प्रवास महागला



**मुंबई :** राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या एसटीने ऐन सणावारांच्या दिवसांत तब्बल १० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

ही भाडेवाढ १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत लागू असणार आहे. या निर्णयामुळे दिवाळीच्या निमित्ताने गावी जाणाऱ्या चाकरमान्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला मोठी झळ बसणार आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, राज्य परिवहन महामंडळाने दिवाळीच्या काळात १० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही भाडेवाड सरसकट सर्वच बसेसना लागू असणार नाही. या निर्णयातून वातानुकूलित शिवनेरी व शिवाई बसेस वगळण्यात आल्या आहेत.

त्यामुळे गावखेड्यापासून रातराणीने लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या सर्वच प्रवाशांना या भाडेवाढीचा फटका बसणार आहे. राज्यात सध्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरीक मेटाकुटीस आला आहे.

त्यातच एसटीने ही भाडेवाढ केल्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे. ताज्या भाडेवाढीमुळे ज्या ठिकाणी पूर्वी १०० रुपये तिकीट होते, तिथे आता ११० रुपये आकारले जातील.

## ज्यांनी बदनामी केली तेच महात्मा गांधींना शरण गेले : हर्षवर्धन सपकाळ

**नागपूर :** कॉंग्रेस पक्षातर्फे संविधान सत्याग्रह पदयात्रा काढण्यात आली आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी बोलताना पुन्हा एकदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार टीका केली आहे. द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत कोणी मांडला हे सर्वांना माहीत आहे, पण बदनामी मात्र महात्मा गांधींची करण्यात आली. परंतु, आज तोच संघ महात्मा गांधी यांना शरण गेला. हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वैचारिक पराभव असल्याचा खोचक टोला हर्षवर्धन सपकाळ यांनी लगावला आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, खोटे बोलून आज भाजपा सत्तेत आला आहे. पण महात्मा गांधी नावाचा संत भाजपा व संघाच्या मानगुटीवर बसलेला आहे. संघाच्या १०० व्या वर्षी सुवर्णयोग आलेला असून भारताचे संविधान व महात्मा गांधी यांचे विचार संघाने स्विकारावे असे आवाहन कॉंग्रेसने केले आहे. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून अद्याप उत्तर मिळालेले नाही. कारण त्यांच्या पायाखालची वाळू सरकलेली आहे.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी आशिया चषकानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या ट्विटवर टीका केली आहे. ते म्हणाले, भारत पाकिस्तान आशिया चषक भारताने पहिल्यांदाच जिंकलेला नाही. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मात्र यातही राजकारण करण्याची संधी सोडली नाही. हवा असो, पाणी असो किंवा खेळ असो नरेंद्र मोदी ध्रुवीकरण करण्यासाठी प्रत्येक गोष्टीत राजकारण आणतात हे त्यांच्या एक्सवरील पोस्टवरून स्पष्ट होते. भारतीय संघाने दणदणीत विजय मिळवला याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, पण देशाची एक विशिष्ट प्रतिष्ठा असते ती मात्र नरेंद्र मोदी जपत नाहीत, अशी खंत देखील सपकाळ यांनी व्यक्त केली.

संघाची दहा तोंडे दहा दिशेनेच नाही तर सर्व प्रतिगामित्वामध्ये दडलेली आहेत त्याचा धिक्कार व दहन करावे, अशी आमची अपेक्षा आहे, असा खोचक सल्ला कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. तसेच संघाला आमचे निवेदन सांगितलेले आहे. निसर्ग व नियती त्यांना सुबुद्धी देवो ही प्रार्थना करत आहे. दसऱ्याला रावणाचे दहन केले जात ते एका व्यक्तीचे नाही तर प्रवृत्तीचे दहन असते, असेही सपकाळ म्हणाले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ ऑक्टोबर २०२५

# दसरा

दसऱ्याच्या मुहूर्ताला दारी
राम पहाऱ्यात शेणा मातीचा सडा
शेणा मातीच्या सड्यावर पडे
रांगोळीचा खडा

दहा डोक्याचा रावण
दारी शेणानं थापून
पाकळ्या झेंडूच्या,
सोबत काड्या धनाच्या टोचून

बेंबीत दूधाचा थेंब घालून
सजतो दसरा अंगणात
अपट्याच्या पानाला येतो सोन्याचा मोल
आपल्यांच्या प्रेमाचा उर येतो भरुन

मोठ्यांच्या पायावरती ठेवतो माथा
गळा भेटीतून बांधतो मना-मनाच्या गाठा
मना-मनामधी कसा गोडवा भरला
दसऱ्या सणाला कसा चेहरा हसला

या विजयादशमीला नाव दुसरे, दसरा
माय दुर्गेने,राक्षस महिषासुर मारला
राम प्रभूंनी रावणाचा वध केला
विजयाचा दिवस हा विजयादशमी झाला

या आनंदात सगळ्यांचा चेहरा होतो हसरा
फुलांसारखी फुलतात मने,येतो जेव्हा दसरा
या दसऱ्याच्या,दिवसाच्या मुहूर्ताला
क्षणा-क्षणाला आनंद राहतो खुलता

नात्यागोत्यांना उजाळा देत
एकमेकांना भेटतो
वडीलधाऱ्यांचा आशीर्वाद घेत
मनात जिव्हाळा जपतो
एकमेकांची भेट घेत
दसऱ्याच्या सर्वांना देतो सदिच्छा
विजयादशमीच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा...

**लक्ष्मण वाल्डे,**
कन्नड
छत्रपती संभाजीनगर

# शहीद भगतसिंग यांनी देशासाठी बलिदान दिले : प्रा. एस.टी.मोगरे




**कन्नड (प्रतिनिधी) :** शिवाजी महाविद्यालय कन्नड राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद भगतसिंग यांची जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक एस.टी मोगरे अर्थशास्त्र विभाग हे प्रमुख उपस्थित होते त्यांनी मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले त्यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना शहीद भगतसिंग हे लहानपणापासून क्रांतिकारी विचाराचे बालक होते ते जेव्हा शाळेमध्ये शिक्षण घेत होते तेव्हा जनरल डायर यांनी जालियनवाला बाग हत्याकांड मध्ये अनेक निष्पाप भारतीय नागरिक यांचा बळी घेतला याचे परिणाम भगतसिंग यांच्या मनावर जीवनावर खोल झाले.

आणि ते अस्वस्थ झाले देशासाठी काहीतरी केलं पाहिजे युवकांनी पुढे आलं पाहिजे ही तळमळ अगतिकता त्यांना बसू देत नव्हती आणि त्यांनी त्याच वेळेस निर्णय घेतला की आपण देशासाठी आता इथून पुढे झोकून देऊन काम करायचं या घटनेचा बदला घेण्यासाठी जालियनवाला बाग हत्याकांड या घटनेचा बदला घेण्यासाठी इंग्रजांना धडा शिकवण्यासाठी इंग्रजांचे कायदे जे भारतीयांना जुलमी आहेत या कायद्यांच्या विरोधात एक क्रांतिकारी पाऊल उचलायचा त्यांनी ठरवलं.

दिल्लीमध्ये मध्यवर्ती विधानसभा आहे त्या विधानसभेमध्ये बॉम्ब फेकून बॉम्बस्फोट त्यांनी 8 एप्रिल 1929 रोजी केले त्यांच्याबरोबर बटुकेश्वर दत्त ही होते इंग्रजांच्या विरोधाचा बदला त्यांनी अशा प्रकारे घेतलेला होता ही आजच्या तरुणाला देखील याच्यातून मार्गदर्शन घेण्यासारखा आहे की देशाहितसाठी संघर्ष तयारी आजच्या तरुणी ठेवली पाहिजे देश संकटात येईल त्यावेळेस तरुणांनी देशाच्या संरक्षणासाठी उभे पाहिजे अशी प्रेरणा भगतसिंग यांच्या कृतितून निर्माण होते असे विचार प्रा एस .टी .मोगरे यांनी विद्यार्थ्यांसमोर व्याख्यान देताना मांडले बॉम्बस्फोट करत असताना इन्कलाब जिंदाबाद क्रांती जिंदाबाद ब्रिटिश साम्राज्याला खाली पाडा अशा घोषणाही त्यांनी त्यावेळेस दिलेले आहेत आणि ते देत होते या कार्यक्रमाला अध्यक्ष समारोप डॉक्टर आर के पवार राज्यशास्त्र विभाग प्रमुख शिवाजी महाविद्यालय कन्नड हे होते त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना भगतसिंग यांची 118जयंती आपण साजरी करत आहात त्यांचे विचार समाजाला विद्यार्थ्यांना आणि तळागाळातील लोकांना प्रेरणादायक आहेत युवकांनी भगतसिंहपासून कायदेशीर समस्या मार्गाने आंदोलन केलं पाहिजे जर अन्याय होत असेल तर त्याला आवाज उठवला पाहिजे त्यांनी त्यांच्या मनोगत व्यक्त केले.

अध्यक्ष समारोप करताना डॉक्टर आर के पवार यांनी भगत यांचे विचार हे आजच्या युवकांना प्रेरणादायक आहेत असे त्यांनी स्पष्ट केले. भगतसिंगच्या विचाराचे महत्त्व पटवून सांगितले त्याच बरोबर या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित होते कार्यक्रम अधिकारी डॉक्टर पी बी महाजन डॉक्टर आर व्ही अहिरराव डॉक्टर एस व्ही काशीद मॅडम हे प्रमुख्याने उपस्थित होते.

तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक डॉक्टर रवींद्र घोती डॉक्टर संजय भालेराव डॉक्टर मीना वडगुळे हे प्रमुख उपस्थिती होती या कार्यक्रमाचे आभार आभार डॉ बीजी देशमुख सर यांनी केले सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी पूजा चव्हाण यांनी केले या कार्यक्रमाला एनएसएसचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात हजर होते.

# निरगुडी बु ठाकरवाडी येथे जनावरांना लंम्पीची लागण

**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील निरगुडी बु ठाकरवाडी येथे जनावरांना लंम्पी या आजाराची लागण झाली आहे या गावातील गायी बैल यांच्या त्वचेवर गाठी व पाय सुजलेले पाहिले आणि गाई बैल आदिवासी ठाकर बांधवांनी जवळील पशुधन डॉ ज्ञानेश्वर बारगळ यांना संपर्क करून आजार पाहण्यासाठी बोलवण्यात आले होते.

परंतु त्यांना लंम्पी हा आजार आहे असे कळताच त्यांनी खुलताबाद तालुक्यातील शासकीय पशुधन अधिकारी डॉ काळे व डॉ नरोटे कर्मचारी यांना कळवले आणि दिनांक २३/०९/२०२५ रोजी व उर्वरित दिनांक ३०/०९/२०२५ रोजी पशुधन अधिकारी यांनी गावात येऊन लसीकरण केले.

यावेळी गावातील व्यक्तींशी चर्चा करतांना म्हणाले की हा आजार लंम्पी स्किन डिसीज हा एक गुरांचा संसर्गजन्य आजार आहे ज्याचा प्रादुर्भाव अनेक जनावरांना होतो या व्हायरसचे दोन वेगवेगळे प्रकार आढळलेले आहेत ज्यामुळे गेल्या वर्षी मोठ्या संख्येने गायीचा मृत्यू झाला आहे.

या आजाराची लक्षणे जनावरांना उच्च ताप येतो त्वचेवर २ ते ५ सेंटीमीटर व्यासाच्या गाठी येतात आजाराची कारणे हा आजार कॅप्रीपॉक्स व्हायरस या विषाणूमुळे होतो आणि त्यांचा प्रसार डास माश्या गोचीड आणि चिलटे यांसारख्या कीटकवाहकांमुळे या विषाणूच्या प्रसार होतो आणी हा आजार होण्याचा आधी लसीकरण करणे गरजेचे आहे.

लंम्पी या आजारामुळे मानवांना संसर्ग होत नाही अशी माहिती पशुवैद्यकीय अधिकारी डॉ काळे व नरोटे यांनी ठाकरवाडीतील सर्व आदिवासी ठाकर बांधवांना लंम्पी या आजाराविषयी माहिती सांगितली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ ऑक्टोबर २०२५


## वाटा साऱ्या हरवलेल्या

वाटा साऱ्या हरवलेल्या
काटे होते सोबतीला
काळरात्र भयाण जीवनी
नित्य होती स्वागताला

फुल गुलाबी शोधताना
बोचले चोरून काटे
भर उन्हात पावसाची
वेड्या मना आस वाटे

सय गोड बालपणीची
स्वप्नी रोज येते आहे
भर दुपारी रानीवनी
आयुष्य पोळते आहे

स्वप्नं सारी फितूर होता
वास्तव जग भेटते आहे
वादळ येता रांगोळीचे
रंग उडुनी गेले आहे

पुन्हा रंग ते भरण्यासाठी
चित्रकार मी होतो आहे
विस्कटलेल्या रांगोळीत
रंग नव्याने भरतो आहे


**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**
**मो. ९४०३३८४८८९**


## मुरुम शहरातील किसान गणेश मंडळ व अखंड हरीनाम सप्ताह समितीचा स्तुत्य उपक्रम




मुरूम, ता. उमरगा येथील किसान गणेश मंडळ व अखंड हरीनाम सप्ताह सोहळा समितीच्या कडून पुरग्रस्त मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरिता तहसीलदारांना निधी पावती सुपूर्द करताना पदाधिकारी व अन्य.

**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरुम शहरातील धाराशिव जिल्ह्याच्या मानाचा आजोबा गणपती म्हणून ओळख असलेल्या किसान चौक येथील किसान गणेश मंडळांने यंदा आपला ७६ वा गणेश उत्सव सोहळा साजरा केला. या सामाजिक जाणीव जपणाऱ्या मंडळाने उत्सवात फक्त आनंद न साजरा करता मदत नव्हे कर्तव्य या ब्रीदवाक्यानुसार पूरग्रस्त बांधवांसाठी पुढाकार घेत उदार हात पुढे केला आहे. सोमवारी (ता. २९) रोजी अखंड हरीनाम सप्ताह सोहळा समितीच्या सहकार्याने उमरगा येथील तहसील कार्यालयात पूरग्रस्त भागातील नागरिकांसाठी जमा केलेली आर्थिक मदत मुख्यमंत्री सहायता निधी खात्यात सुपूर्द करण्यात आली. जिल्ह्यातील आपत्तीग्रस्त बांधवांच्या पाठीशी उभे राहत समाजकारणाची नवी दिशा दाखवणारे हे कार्य कौतुकास्पद ठरले आहे. यावेळी मदतीची अधिकृत पावती तहसीलदार गोविंद येरमे यांच्याकडून प्रदान करण्यात आली. या प्रसंगी किसान गणेश मंडळाचे अध्यक्ष व्यंकटराव चौधरी, उपाध्यक्ष हणमंत वागदरे, अखंड हरीनाम समितीचे व्यंकट जाधव, नंदकुमार अंबर, विश्वजीत अंबर, अरविंद फुगटे, शाहूराज शिंदे, भीमराव फुगटे, प्रल्हाद माळी, ईश्वरचंद्र अंबर, बाळासाहेब खंडागळे, राजेंद्र खंडागळे, गणेश जाधव, देवानंद फुगटे, ज्ञानेश्वर वागदरे, अनिल भुसाळे, राहुल सत्रे, शंकर टेकाळे, हणमंत टेकाळे, पिंटू सत्रे आदींची उपस्थिती होती.

## परतीच्या पावसाने यंदा परिसरातील सीताफळ चे पिक चांगलेच बहरले



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** परतीच्या पावसाने यंदा परिसरातील सीताफळ चे पिक चांगलेच बहरले आहे सीताफळाचे ' माहेर घर ' दौलताबाद चे सीताफळ पूर्ण महाराष्ट्रात व् पंचक्रोशित प्रसिद्ध आहेत तसेच येथील सीताफळा ला गुजरात,मुम्बई, हैदराबाद ,मध्यप्रदेश ला फार मागणी आहेपरन्तु गेल्या काही वर्षापासून निसर्गाच्या अवकृपे मुळे या रानमेव्याची चव दुर्मिळ झाली होती.

वनराइ ने नटलेला परिसर,घाट माथ्यात ,दरी खोलीत मुखःयत हे पिक बहरत असते यास खत पानी ,किंवा विशिष्ठ प्रकार ची मेहनत घेण्याची अवश्क्यता नसतेफ़क्त पावसाचे प्रमाण चांगले असणे गरजेचे आहे पण आता परिसरातील बऱ्याच शेतकऱ्यांनी सीताफळाची बागा लावली आहे.

यातून चांगल्या प्रकारचे उत्पन्न मिळत आहे सिताफळ आता बागा मध्ये पिकत आहे या हंगामी पिकामुळे बरेच लोकांना रोजगार उपलब्ध होते महिला रानातून टोपल्या भरून विकायला आणत आहे एका टोपल्याची किंमत १०० ते १५० दराने विकत आहे तर दुकाना वर सिताफळ ४० ते पन्नास रुपये प्रतिकिलो ने विकत आहे.

यातुन पैसे पण मुबलक मिळतात कारण याच दिवसात पर्यटक यांना साहजिक फळ त्याना आकर्षित करण्यात सफल होते व् ते या फळांची चव चाखल्या शिवाय राहत नाहींयंदा या फळाला परतीच्या पावसाने निश्चितच " अच्छे दिन " आले असे म्हणणे वावगे ठरु नयेदौलताबाद ते खुलताबाद रस्त्याच्या कडेला सिताफळ विकणारे महिला व जागोजागी दुकाने पर्यटकाना आकर्षित करत आहे


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ ऑक्टोबर २०२५


## तातडीने ओला दुष्काळ, सरसकट कर्जमाफी जाहीर करा : सुप्रिया सुळे

**मुंबई** : राज्यात आलेल्या पूर परिस्थितीवर काय उपाययोजना करावा या संदर्भातील सविस्तर दोन पत्र आदरणीय पवार साहेबांनी राज्य सरकारला दिलेले असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. या पत्रामध्ये काय उपाययोजना तातडीने कराव्या तसेच काही सूचना देखील आदरणीय पवार साहेब यांनी केले आहे.

मी दोन महिन्यांपूर्वी खरंतर मी केंद्रीय मंत्री अमित शहा यांना भेटून सांगितले होते की ओला दुष्काळ जाहीर करा. आणि सरसकट कर्जमाफी करा पण आता तीव्रता आणि अतिवृष्टी एवढी वाढलेली आहे की आता दोन भागात काम करावे लागणार आहे. एक तर ओला दुष्काळ जाहीर झालाच पाहिजे. त्याचबरोबर सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजेत. ही एक बाजू तर दुसरी बाजू रिहॅबिलिटेशन बाबत देखील काम करावे लागेल. असे सुप्रिया सुळे बोलताना म्हणाल्या.

राज्यात अतिवृष्टीमुळे बळीराजासह सामान्य नागरिकांचा संसार उध्वस्त झाला आहे. बळीराजाचा हातात आलेले पीक अतिवृष्टीमुळे वाहून गेले आहे. त्यामुळे बळीराजा मोठा संकटात सापडला आहे. तसेच अतिवृष्टीमुळे नागरिकांचे संसार पाण्यात वाहून गेला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शेती विषयक आणि जीवनावश्यक वस्तू बळीराजाला आणि नागरिकांना मदत म्हणून प्राथमिक स्वरूपात आज सात ते दहा दहा ट्रक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुंबईतील मुख्य कार्यालयातून पाठवण्यात आले, या वेळी त्या बोलत होत्या.

केंद्राची मदत आपल्याला लागणारच

सुप्रिया सुळे म्हणाल्या की,सरकारने पुढाकार घेऊन डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर आर्थिक मदत करता येते. पंजाबच्या सरकारने ५० हजार रुपये एकरी दिलेले आहेत. तर त्यांच्याकडूनही महाराष्ट्र सरकारला माहिती हवी असेल त्या पद्धतीने पंजाब सरकारने काम केले तेही करावे. केंद्र सरकारमध्ये केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान साहेबांना मी स्वतः भेटले त्यानंतर मुख्यमंत्री हे प्रधानमंत्री भेटले आहे. मात्र त्याचं नंतर काय झालं हे मुख्यमंत्री सांगू शकतील. केंद्रातून आपल्याला किती मदत मिळणार आहे पण केंद्राची मदत आपल्याला लागणारच आहे कारण की, मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल आहे. असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

ही नियम आणि निकष लावायची वेळ नाही

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, पुरामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून, ही नियम आणि निकष लावायची वेळ नसून माणुसकी दाखवायची वेळ आहे. मला कळत नाही की सरकार एवढं हात राखून का वागत आहे. संकटात सापडलेल्या पूराग्रस्तांना तातडीने मदत झालीच पाहिजे. तसेच सरसकट कर्जमाफी आणि तातडीने ओला दुष्काळ जाहीर झाला पाहिजे.आता लोकांना उभं करणं गरजेचे आहे. शाळा , महाविद्यालये उभं करणं. लोकांना मदत करावी लागेल. आधी ओला दुष्काळ जाहीर करा. मुलींना वह्या पुस्तके द्या. डीबीटीची सोय आहे. जिथे परिणाम नाही तिथली यंत्रणा आपदग्रस्त भागात काम करण्याकरिता पाठवता येईल का हे देखील सरकारने करावे. ही कायदे नियम लावण्याची वेळ नाहीए. सरकार हातरोखून मदत का करतेय. सरसकट कर्जमाफी आणि ओला दुष्काळ जाहीर झालाच पाहीजे. असेही सुप्रिया सुळे यांनी बोलताना स्पष्ट केले आहे.

## डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम आंतरराष्ट्रीय फाउंडेशन तर्फे दिल्ली येथे राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर** : १५ ऑक्टोबर २०२५ रोजी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, जनतेचे राष्ट्रपती आणि भारताचे मिसाईल मॅन यांची ९४ वी जयंती आहे.

त्यांच्या दूरदृष्टीला सन्मान देण्यासाठी, आणि कलाम सर यांचे स्वप्नातील भारताची निर्मिती करण्यात उद्योन्मिक युवकांचा तंत्रध्यान क्षेत्रात सहभाग नोंदण्या साठी फाउंडेशनने नवी दिल्ली येथे एक राष्ट्रीय परिषद व उत्सव आयोजित करीत आहे.

ज्यामध्ये भारताच्या अवकाश, चंद्र आणि सूर्य मोहिमांतील प्रगतीचे दर्शन घडवले जाईल. सदर उपक्रमात शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अवकाश विज्ञानातील नवकल्पना विकसित करण्यासाठी प्रेरणा दिली जाईल . भारताच्या अवकाश क्षेत्रातील यशोगाथांचे प्रदर्शन केले जाईल तसेच विद्यार्थ्यांना इस्रोच्या शास्त्रज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल.

या उपक्रमा द्वारे उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधनाला प्रोत्साहन दिले जाईल . रिमोट सेन्सिंग , MEMS (मायक्रो-इलेक्ट्रो मेकॅनिकल सिस्टम), नॅनोतंत्रज्ञान , ऊर्जाअवकाश औद्योगिक क्रांती अश्या विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांना आपल्या स्वतःच्या संकल्पना मांडण्याची संधी या उपक्रमा मार्फत विद्यार्थ्यांना दिल्ली येथे दिली जाईल . इस्रो शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि राष्ट्रीय तज्ज्ञ यांचा सक्रिय सहभाग या परिषदेमध्ये असेल.

१३,१४,१५ ऑक्टोबर २०२५ असे ३ दिवस हि परिषद दिल्ली येथे आयोजित केलेली आहे. १३ तारखेला शालेय विद्यार्थी , आणि १४ तारखेला महाविद्यालयीन विद्यार्थी आपल्या संकल्पना मांडतील .इसरो आणि इतर शास्त्रज्ञ आणि शिक्षण तज्ज्ञ अवलोकन करतील.

उत्कृष्ट संकल्पनांना दिनांक १५ ऑक्टोबर रोजी कलाम सर यांचे वाढदिवसाचे दिवशी दिल्ली येथे सन्मानित करून पारितोषिक दिले जातील . यात उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्त्यांनी आपल्या संकल्पनेचे ७ मिनिट चे पॉवर पॉईंट प्रेसेंटेशन आणि त्याच्या २ प्रिंट आऊट घेऊन दिल्ली येथे यायचे आहे.

इसरो आणि इतर शास्त्रज्ञ आणि शिक्षण तज्ज्ञ यांचे समोर सादर संकल्पना ७ मिनिट मध्ये मांडायची आहे. कुठलेही प्रत्यक्ष मॉडेल बनवून आणणे अपेक्षित नाही . विद्यार्थ्यांच्या अभिनव संकल्पनांना वाव देऊन त्यांना पुढे संशोधन करण्यास प्रोत्साहित करणे हा उद्धेश आहे. जास्तीत जास्त शिक्षण संस्थांनी कलाम कुटुंबीयांतर्फे आयोजित कार्यक्रमात आपल्या विद्यार्थ्यांना सहभागी करून विकसित भारताचे कलाम सर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी देश हित लक्षात घेऊन नवीन पिढी घडविण्यात आपला वाट उचलावा असे आव्हान करण्यात येत आहे . यात विद्यार्थ्यांना सहभाग विनामूल्य घेता येणार आहे . मात्र नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना दिल्ली येथे प्रवास आणि निवास स्वखर्चाने करायचा असून नाश्ता आणि दुपारचे भोजन संस्थे तर्फे कार्यक्रम स्थळी विनामूल्य दिले जाईल . सदर उपक्रमात संपूर्ण देशातून विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभाग घेत असून ३०० संकल्पना घेण्यात येणार असल्याने ३ ऑक्टोबर २०१५ पर्यंत शिक्षण संस्था आणि विद्यार्थी याना नाव नोंदणी करता येईल अधिक माहिती साठी मिलिंद चौधरी, सचिव डॉ एपीजे अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाऊंडेशन यांचे शी संपर्क करावा.

तसेच छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) विभागासाठी श्रीरंग औचरमल 8830303665 यांचेशी संपर्क साधावा असे आव्हान एपीजेमजे शेख सलीम (कलाम सर यांचे पणतू ) , संस्थापक ट्रस्टी डॉ एपीजे अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाऊंडेशन , हाऊस ऑफ कलाम , आणि कोअर कमिटी मेंबर श्रीरंग औचरमल रामेश्वरम यांचे तर्फे करण्यात येत आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com



डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103

8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ ऑक्टोबर २०२५


## दुर्गा अवतारातून सामाजिक जाणिवजागृती



**धोत्रा (ता. सिल्लोड) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रा येथे सामाजिक भान निर्माण करण्यासाठी "दुर्गा अवतार" हा अनोखा व उपयुक्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन समाजसेविका व शिक्षिका श्रीमती सरला कामे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना समाजातील विदारक समस्या व वाईट प्रथा यांविषयी जागरूक करणे हा होता. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेत, हातात फलक धरून समाजातील विविध गंभीर समस्या मांडल्या.

बालविवाह, लैंगिक असमानता, हुंडाबळी, भ्रूणहत्या यांसारख्या अनेक सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकण्यात आला. विद्यार्थ्यांच्या हातात "1098 – चाईल्ड लाईन", "1091 – महिला हेल्पलाईन", "101 – अग्निशमन", "108 – रुग्णवाहिका", "181 – महिला सक्षमीकरण" अशा महत्वाच्या हेल्पलाईन क्रमांकांचे फलक होते.

वाइट प्रथा बालविवाह,पोक्सो कायदा ,मुलीवर होणारे अत्याचार, भ्रूण हत्या,हुंडाबळी,कौटुम्बिक हिंसाचार यांसारख्या कुप्रथांचा बिमोड करणे व जाणीवजागृती या सादरीकरणाद्वारे समाजातील वाईट प्रथांविरुद्ध विद्यार्थ्यांनी आवाज बुलंद केला आणि 'दुर्गा अवतार'

## आपल्या वाटा आपणास शोधता आल्या पाहिजेत : डॉ. सत्यशीला तौर



**कन्नड (प्रतिनिधी) :** आपल्या विकास व जडणघडणीत महाविद्यालयाचा मोठा वाटा असतो. ही आयुष्याची ज्ञ शिदोरी प्रत्येक वळणावर उपयोगी पडते. नियमित आल्यास खूप काही शिकायला मिळते.

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. वाङ्मय मंडळ हे नवप्रतिभावंतासाठी हक्काचे व्यासपीठ असते. त्यातूनच व्यक्तिमत्व विकास होतो. समाजाकडे डोळस व संवेदनशिलतेने पहायला व जगायला साहित्य शिकवते. विद्यार्थ्यांनी या व्यासपीठाचा उपयोग करून पुढील आयुष्याच्या आपल्या वाटा आपणास शोधता आल्या पाहिजेत. असे प्रतिपादन प्रसिद्ध कवयित्री व लेखिका डॉ. सत्यशीला तौर यांनी केले. (ता. २६ ) येथील शिवाजी महाविद्यालयाच्या भाषा वाङ्मय मंडळाचे उदघाटन प्रसंगी त्या उदघाटक म्हणून उपस्थित होत्या.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले होते. मंचावर उपप्राचार्य डॉ. बी . के. मगर, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. अलका गडकरी, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. विजय मातकर, हिंदी विभाग प्रमुख डॉ. जी.के. बुरसे, डॉ. रामचंद्र झाडे, प्रा. अशोक भोसीकर,कु. पुजा चा यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक भाषा व वाङ्मय मंडळ समिती प्रमुख डॉ. शिवाजी हुसे यांनी केले तर परिचय डॉ. अलका गडकरी यांनी करून दिला. यावेळी भाषा व वाङ्मय मंडळ अध्यक्ष कु. पुजा चव्हाण हीने मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी मराठी, हिंदी व इंग्रजी विषयाच्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. सत्यशीला तौर यांनी आपली ग्रामीण कथेचे कथाकथन करून विद्यार्थ्यांची दाद मिळवली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केला. सूत्रसंचलन कु. साक्षी धनेधर हीने केले . कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक यांची उपस्थिती होती.

## डॉ. रामलिंग पुराणे हे नवी दिल्ली येथे क्रिएटिव्ह भारत अवॉर्डने सन्मानित




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरुम येथील सामाजिक कार्यकर्ते तथा बसव प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. रामलिंग काशिनाथ पुराणे यांना नवी दिल्ली येथील नमस्ते क्रिएटिव्ह भारतच्या माध्यमातून मॅगझीन मध्ये डॉ. पुराणे यांचे सामाजिक कार्याचे पॉवर प्रोफाइल ची निवड झाली आहे,

दि. 28 वार रविवार रोजी नवी दिल्ली येथील इंडिया इंटरनॅशनल सेंटर येथे पार पडलेल्या कार्यक्रमात त्यांना क्रिएटिव्ह भारत अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी दक्षिण दिल्ली मा. खासदार रमेश बिधुरी,डायरेक्टर टेक्नॉलॉजि अँड इनोव्हाशन्स प्रा. डॉ. आर. के. खंडाल, कमांडर, इंडियन नेव्ही वेत्रण व्ही. के. जेटली, पूर्व लोकसभा टीव्ही सी ई ओ सीमा गुप्ता, कथक डान्सर डॉ. अनु शर्मा, इंटरनॅशनल किक बॉक्सर सुधीर सक्सेना, आयोजक जितेंद्र तिवारी, राजेश तिवारी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

नमस्ते क्रिएटिव्ह भारत या चळवळीच्या माध्यमातून संपूर्ण देशभरातून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन त्यांचे राष्ट्रहितासाठीचे प्रेरणादायी कार्याचे पॉअर प्रोफाइल नमस्ते क्रिएटिव्ह भारत या मॅगझीन मध्ये प्रकाशित करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्रातून उपस्थित डॉ. पुराणे यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी कु. रुद्राक्षी रामलिंग पुराणे सह देशभरातील नागरिक उपस्थित होती.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ ऑक्टोबर २०२५

# आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन : अनुभवी पिढीचा सन्मान आणि मानवी मूल्यांची जपणूक

मानवी जीवन हा एक अखंड प्रवास आहे. या प्रवासाला बाल्य, तरुणपण, प्रौढत्व आणि वार्धक्य अशी टप्प्यांची शृंखला लाभते. मानवी जीवनाची घडी या चार प्रमुख टप्प्यांभोवती फिरते असते या प्रत्येक टप्प्यात जीवन नवे अनुभव, नवे प्रश्न, नवे उत्तर घेऊन समोर येते. प्रत्येक टप्पा आपल्याला काही ना काही देतो, शिकवतो. बाल्य निरागसतेने भारलेले असते, तरुणपण उत्साहाने आणि धाडसाने झळाळते, प्रौढत्व जबाबदारीच्या जाणिवेने सजते आणि वार्धक्य आयुष्याचा परिपक्व अनुभव घेऊन येते. वार्धक्य हा टप्पा अनेकदा दुर्बलतेशी, आजारपणाशी, असहाय्यतेशी जोडला जातो; वार्धक्य हा जीवनाचा शेवटचा टप्पा असला तरी पण प्रत्यक्षात तो आयुष्यभर साठवलेल्या ज्ञानाचा, परंपरांचा, संस्कारांचा आणि संघर्षांचा खजिना आहे. या अनमोल खजिन्याचे महत्त्व समाजाला सतत पटवून देण्यासाठी व वृद्धांचा सन्मान करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन (International Day for Older Persons) म्हणून जाहीर केला.

१९९० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने या दिनाची घोषणा केली आणि १९९१ पासून जगभरात त्याचे औपचारिक पालन सुरू झाले. या उपक्रमामागील हेतू केवळ एका दिवसापुरता वृद्धांना अभिवादन करणे, शुभेच्छा देणे नाही, तर त्यांचे हक्क, त्यांचे आरोग्य, त्यांची सामाजिक व आर्थिक सुरक्षा आणि त्यांचा सन्मान याबाबत सातत्याने जागरूकता निर्माण करणे हा आहे. दरवर्षी या दिवसाला एक संकल्पना वा घोषवाक्य दिले जाते. ज्यामधून वृद्धकल्याणाच्या एखाद्या महत्त्वाच्या पैलूवर लक्ष केंद्रीत केले जाते. कधी "Leaving No One Behind" तर कधी "Resilience of Older Persons in a Changing World" अशा संकल्पना वृद्धांच्या प्रश्नांवर आणि समाजातील त्यांच्या भूमिकेवर प्रकाश टाकतात. 'Leaving No One Behind' ही संकल्पना काही वर्षांपूर्वी देण्यात आली होती. या वाक्याचा गाभा असा की, समाजातील कोणताही घटक मागे राहू नये; विशेषतः वृद्ध व्यक्तींना प्रगतीच्या प्रवाहात सहभागी करून घेतले जावे. तर "Resilience of Older Persons in a Changing World" या वाक्याचा गाभा असा की, "बदलत्या जगात वृद्ध व्यक्तींची लवचिकता" असायला पाहिजे.

भारतीय समाजरचनेत प्राचीन काळापासून वृद्धांना मानाचे स्थान आहे. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव' या वाक्यांतून वृद्धांचा सन्मान किती खोलवर रुजला आहे हे दिसून येते. गुरू, आई-वडील, आजी-आजोबा हे घरातील आधारस्तंभ मानले गेले. त्यांच्या आशीर्वादाशिवाय जीवनातील कार्य अपूर्ण समजले जात होते. परंपरा, संस्कार, अनुभव आणि मार्गदर्शन यांचा खरा वारसा हीच वृद्ध पिढी पुढील पिढ्यांना देत आली आहे. परंतु आधुनिकतेच्या, औद्योगिकीकरणाच्या आणि शहरीकरणाच्या वादळाने कुटुंबव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवले. संयुक्त कुटुंब व्यवस्थेत तर वृद्ध हे केंद्रबिंदू होते. त्यांचे अनुभव, त्यांची निर्णयक्षमता व शहाणपण यामुळे घरातील तणाव मिटत असे. संयुक्त कुटुंब पद्धती मोडून विभक्तकुटुंब पद्धती रुजली जात आहे. तसेच शहरीकरण, स्थलांतर, नोकरी-व्यवसायाच्या धकाधकीमुळे वृद्धांचे स्थान काहीसे दुय्यम झाले आहे. आज अनेक वृद्धांना मुलांपासून दूर राहावे लागत असून त्यामुळे वृद्धाश्रमांची संख्या वाढत चालली आहे. काही वृद्धांना आपल्या घरातच उपेक्षा, एकाकीपणा, निराधारपण आणि असहाय्यतेचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन आपल्याला आत्मपरीक्षणास भाग पाडतो.

वार्धक्यातील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे आरोग्य होय. शरीराची झीज अपरिहार्य असते. वय वाढत जाताना शरीरात अनेक विकार निर्माण होतात. वाढते वय मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, संधिवात, कर्करोग, स्मृतिभ्रंश, दृष्टी व श्रवणदोष यांसारख्या आजारांना आमंत्रण देते. वैद्यकीय उपचारांची महागाई आणि आरोग्य व्यवस्थेतील कमतरता यामुळे वृद्धांना योग्य उपचार मिळत नाहीत. विशेषतः ग्रामीण भागात आरोग्य सुविधा अपुऱ्या आहेत. शासनाने जेष्ठ नागरिकांसाठी विमा योजना, आरोग्य कार्ड योजना सुरू केल्या असल्या तरी प्रत्यक्ष लाभ प्रत्येक गरजू वृद्धापर्यंत पोहोचत नाही. केवळ शारीरिक आरोग्य नव्हे, तर त्याहूनही महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मानसिक आरोग्य होय. मानसिक आरोग्य हीसुद्धा वृद्धांमधील एक गंभीर समस्या आहे. मुलांपासून दूर राहणे, एकटेपणा, संवादाचा अभाव, सामाजिक उपेक्षा, आत्मीयतेचा तुटवडा यामुळे अनेक वृद्ध नैराश्याने ग्रस्त होतात. काही वेळा हे नैराश्य इतके तीव्र होते की आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतले जातात. म्हणूनच कुटुंबीयांनी वृद्धांसाठी वेळ देणे, त्यांच्या मनातील भावना ऐकून घेणे, संवाद साधणे हे महत्त्वाचे ठरते.

आरोग्यानंतरचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वृद्धांची सामाजिक आणि आर्थिक सुरक्षितता होय. कामकाज संपल्यावर उत्पन्नाचे साधन थांबते, उत्पन्नाचे स्रोत बंद होतात. पेन्शन, बचत, नोकरीतील ग्रॅच्युइटी, मुलांचा आधार किंवा समाजाची मदत यावर वृद्धांचे जीवन अवलंबून राहते. परंतु सर्वांनाच पेन्शन किंवा आर्थिक आधार मिळतो असे नाही. तर अनेक वृद्ध दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतात. अशावेळी शासनाच्या ठोस सामाजिक सुरक्षा योजना, अनुदाने, पेन्शन योजना या अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. मोफत प्रवास, सवलतीच्या आरोग्य सेवा, वयोवृद्धांना प्राधान्य, अशा सोयी सुविधा केवळ औपचारिक राहू नयेत, तर प्रत्यक्षात त्यांचा लाभ मिळावा. परंतु त्याचा लाभ मिळवण्यासाठी लागणारी कागदपत्रे, अर्ज, प्रक्रियांचा अडथळा हे सर्व वृद्धांसाठी त्रासदायक ठरते. म्हणूनच सोपी आणि सुलभ प्रक्रिया करून या योजनांचा लाभ प्रत्येक वृद्धापर्यंत पोहोचवणे हे शासनाचे कर्तव्य आहे.

वृद्धांचा सन्मान करणे म्हणजे फक्त औपचारिक आदर व्यक्त करणे नाही. तर त्यांच्या अनुभवाला, कौशल्याला आणि शहाणपणाला समाजात स्थान देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. अनेक वृद्धांकडे अपार अनुभवसंपदा आहे. त्यांच्या संघर्षकथांमधून तरुणांना प्रेरणा मिळू शकते. लहान मुलांना आजोबा-आजींच्या गोष्टींमधून संस्कार मिळतात. शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था, स्वयंसेवी संस्था, तरुण उद्योजक यांनी वृद्धांच्या अनुभवाचा उपयोग विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी करायला हवा. निवृत्त व्यक्तींना अध्यापन, मार्गदर्शन, स्वयंसेवा यामध्ये सामावून घेतले, तर त्यांना आयुष्याचा नवा अर्थ मिळू शकेल. निवृत्ती ही जीवनातील शेवट नसून नव्या संधींचा आरंभ असू शकतो. शिक्षक, शेतकरी, कारागीर, अधिकारी, व्यापारी अशा विविध क्षेत्रांत अनुभव मिळवलेले वृद्ध समाजासाठी अजूनही उपयुक्त ठरू शकतात.

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे वृद्ध बहुधा मागे पडतात. मोबाईल ॲप्स, ऑनलाइन बँकिंग, आरक्षण, डिजिटल पेमेंट, आरोग्य नोंदी यांची माहिती त्यांना कठीण जाते. यामुळे त्यांना असुरक्षिततेची भावना निर्माण होते. म्हणूनच डिजिटल साक्षरता हा आजच्या काळाचा अत्यंत आवश्यक भाग आहे. त्यामुळे त्यांना डिजिटल साक्षरता देणे गरजेचे आहे. तरुण पिढीने धीराने वृद्धांना शिकवले, मार्गदर्शन केले, मदत केली, तर त्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि त्यांचे जीवन अधिक सोपे आणि आत्मनिर्भर होईल. वृद्धांच्या जीवनात कला, संस्कृती, अध्यात्म आणि छंद यांना महत्त्वाचे स्थान आहे. वाचन, लेखन, संगीत, चित्रकला, योगाभ्यास, प्रवास, बागकाम अशा छंदांमुळे त्यांचे जीवन आनंदी बनू शकते. समाजाने व शासनाने यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले पाहिजे. वृद्धांसाठी विशेष ग्रंथालये, उद्याने, व्यायामशाळा, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रवास योजना, पर्यटन योजना, सामाजिक मैत्री गट या माध्यमांतून त्यांना जीवनाचा नवा उत्साह मिळून त्यांचे जीवन अधिक रंगतदार होऊ शकते.

भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना समान हक्क दिले आहेत. वृद्धांना त्यांच्या वयानुसार सन्मान, सुरक्षा आणि सुविधा मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. भारत सरकारने २००७ मध्ये 'पालक व वरिष्ठ नागरिकांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम' लागू केला. या कायद्यानुसार वृद्धांना त्यांच्या मुलांकडून किंवा नातेवाईकांकडून पालनपोषणाची मागणी करता येते. तसेच शासनाने वृद्धांसाठी विविध योजना राबवल्या आहेत. मात्र कायद्याची खरी अंमलबजावणी आणि योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे ही खरी जबाबदारी समाजावरच आहे. आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन आपल्याला मानवी मूल्यांची आठवण करून देतो. वृद्धांचा सन्मान म्हणजे फक्त नमस्कार करणे नाही; तर त्यांच्या भावना समजून घेणे, त्यांच्या गरजा पूर्ण करणे, त्यांच्या आयुष्यात अर्थपूर्ण सहभाग निर्माण करणे, हेच खरे उद्दिष्ट आहे. आपण वृद्ध झाल्यावर आपल्याला जसा सन्मान आणि आधार अपेक्षित असेल, तसाच आजच्या वृद्धांना द्यावा, ही खरी संस्कृती आहे. कधी कधी तरुण पिढी वृद्धांच्या विचारांना 'जुने' म्हणून नाकारते. पण हे विसरणे चुकीचे ठरेल की आजच्या प्रगतीचा पाया ह्याच वृद्धांच्या कष्टांवर, त्यागावर आणि संघर्षावर रचला आहे. त्यांच्या घामामुळे उभे राहिलेले शेत, कारखाने, शाळा, संस्था आज समाजाला लाभ देत आहेत. त्यामुळे त्यांचा सन्मान करणे हे केवळ कर्तव्य नव्हे तर आपली जबाबदारी आहे. आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन केवळ एक औपचारिक उत्सव म्हणून न पाहता तो आत्मपरीक्षणाचा दिवस म्हणून साजरा करायला हवा. आपण आपल्या घरातील, आपल्या समाजातील वृद्धांना किती सन्मान, किती आधार, किती प्रेम देतो याचा विचार करायला हवा.

वार्धक्य हे जीवनाचे ओझे नाही, तर ते आयुष्याच्या प्रवासाची एक सुंदर संध्याकाळ आहे. संध्याकाळ सुंदर व्हावी यासाठी सकाळपासून मेहनत घ्यावी लागते. जसा मावळता सूर्य आकाशाला लालिमा देऊन जातो, तशीच वृद्धांची उपस्थिती समाजाला शांततेचा, शहाणपणाचा आणि समाधानाचा संदेश देते. जशी सकाळ नवी ऊर्जा घेऊन येते, तसा वार्धक्याचा काळ अनुभवाचा, ज्ञानाचा आणि शांततेचा साठा घेऊन येतो. या संध्याकाळी जर कुटुंबाचे प्रेम, समाजाची साथ आणि शासनाची मदत मिळाली, तर जीवनाचा शेवटचा टप्पा सुवर्णमयी ठरू शकतो. आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन आपल्याला हीच प्रेरणा देतो की वृद्धांचा सन्मान करणे म्हणजे आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि मानवतेचा सन्मान करणे होय.

आजच्या या विशेष दिवशी आपण सर्वांनी अशी प्रतिज्ञा करूया की आपल्या आजूबाजूच्या प्रत्येक वृद्ध व्यक्तीला आपण आपुलकीचा स्पर्श देऊ, त्यांच्या अनुभवाला आदर देऊ, त्यांच्या जीवनातील संध्याकाळ अधिक सुखकर बनवण्यासाठी आपापल्या परीने योगदान देऊ. कारण वृद्ध हेच आपल्या अस्तित्वाचे मूळ आहेत; त्यांना सन्मान देणे म्हणजे आपल्या भविष्याच्या फुलोऱ्याला खतपाणीघालून भविष्याची पायाभरणी अधिक भक्कम करणे होय.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्र आणि वृद्धत्वशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
**ईमेल –**
**bagate.rajendra5@gmail.com**